आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता

२६ ऑगस्ट २०२५ - मंगळवार

**ठळक बातम्या**

- साठेबाजी रोखण्यासाठी गव्हाच्या साठ्यावर मर्यादा घालण्याचा केंद्र सरकारचा निर्णय

- उच्च महाविद्यालयात शिकवणाऱ्या राज्यातल्या २ प्राध्यापकांना राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार जाहीर

- राज्यभरात गणेशोत्सवाची जय्यत तयारी, सार्वजनिक मंडळांसह घरोघरी गणपतीच्या आगमनाचा उत्साह

- जम्मू काश्मिरमध्ये पुरामुळं १० जणांचा मृत्यू, पंजाबमध्ये ४ दिवस शाळा बंद

**आणि**

- अमेरिकेनं भारतातून आयात केलेल्या वस्तूंवर लादलेला अतिरिक्त २५ टक्के कर उद्यापासून लागू होणार, शेअर बाजारात जोरदार घसरण

**<><><><>**

गव्हाची साठेबाजी रोखण्यासाठी सरकारनं गव्हाच्या साठ्यावर मर्यादा घातली आहे. घाऊक व्यापाऱ्यांसाठी साठवणूक मर्यादा तीन हजारावरून दोन हजार टन तर किरकोळ विक्रेत्यांसाठी ही मर्यादा आठ टन इतकी केली आहे. गव्हाची साठवणूक करणाऱ्या सर्व संबंधितांनी त्यांच्याकडच्या साठ्याची माहिती जाहीर करावी आणि दर शुक्रवारी व्हीट स्टॉक पोर्टलवर माहिती अद्ययावत करावी अशा सूचना ग्राहक व्यवहार, अन्न आणि सार्वजनिक वितरण मंत्रालयानं दिल्या आहेत.

**<><><><>**

भारताच्या मेक इन इंडियाच्या प्रवासात आज एक नवा अध्याय जोडला जात असून मेक फॉर वर्ल्डच्या दिशेनं ही मोठी झेप आहे, असं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलं. गुजरातमधल्या हंसलपूर इथं मेड इन इंडिया बॅटरी इलेक्ट्रिक वाहनं - 'ई वितारा'चं उद्घाटन प्रधानमंत्र्यांनी केलं, त्यावेळी ते बोलत होते. ही वाहनं युरोप आणि जपानसारख्या प्रमुख बाजारपेठांसह शंभराहून अधिक देशांमध्ये निर्यात होणार आहेत. भारत आणि जपान संबंधांना यामुळे नवा आयाम मिळेल असं प्रधानमंत्री म्हणाले.

प्रधानमंत्र्यांनी इथल्या सुझुकी मोटार प्रकल्पालाही भेट दिली. हंसलपूर इथं हायब्रिड बॅटरी इलेक्ट्रोड्सच्या स्थानिक उत्पादनाचाही प्रारंभ यावेळी झाला. तोशिबा, सुझुकी आणि डेन्सो यांचा हा संयुक्त उपक्रम आहे.

<><><>

मुंबईच्या माझगाव नौदल गोदीत तयार झालेल्या उदयगिरी या अत्याधुनिक युद्धनौकेचं कार्यान्वयन आज विशाखापट्टणम इथल्या नौदल तळावर संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांच्या हस्ते झालं. कोलकात्याच्या गार्डन रीच शिपबिल्डर्स अँड इंजिनिअर्स गोदीत तयार झालेली हिमगिरी युद्धनौका देखील नौदलाच्या ताफ्यात दाखल झाली. नौदलाच्या दोन वेगवेगळ्या गोद्यांमध्ये तयार झालेल्या दोन लढाऊ नौका एकाच वेळी कार्यान्वित होण्याचा हा पहिलाच प्रसंग होता.

<><><>

देशातल्या शिक्षण व्यवस्थेत सरकारी शाळांचं योगदान महत्त्वाचं असून एकूण विद्यार्थ्यांपैकी ५६ टक्के विद्यार्थी या शाळांमधे शिक्षण घेत असल्याचं एका सर्वेक्षणात समोर आलं आहे. ग्रामीण भागातले ६६ टक्के विद्यार्थी सरकारी शाळेत शिक्षण घेतात, तर शहरी भागातले ३० टक्के विद्यार्थी सरकारी शाळांमधे शिकतात. चालू वर्षात सरकारी शाळांमधे कुटुंबाने प्रति विद्यार्थी केलेला खर्च दोन हजार ८६३ रुपये आहे, तर खासगी शाळेत हा खर्च २५ हजार रुपये इतका आहे.

<><><>

राष्ट्रीय शिक्षक पुरस्कारांसाठी उच्च शिक्षण संस्था आणि तंत्र शिक्षण संस्थांमधल्या २१ शिक्षकांची निवड झाली आहे. त्यात महाराष्ट्रातल्या डॉ. नीलाक्षी जैन आणि प्रा. पुरुषोत्तम पवार यांचा समावेश आहे. डॉ. जैन मुंबईतल्या शहा आणि अँकर कच्छी अभियांत्रिकी महाविद्यालयात, तर प्राध्यापक पवार बारामतीच्या एस.व्ही.पी.एम तंत्रज्ञान आणि अभियांत्रिकी संस्थेत अध्यापनाचं काम करतात.

<><><>

जीएसटी, अर्थात वस्तू आणि सेवा कराच्या दरांबाबत अंदाज व्यक्त करणं टाळावं, असं आवाहन सीबीआयसी अर्थात केंद्रीय अप्रत्यक्ष कर मंडळानं नागरिकांना केलं आहे. जीएसटी परिषद एकत्रितपणे याबाबतचे निर्णय घेते, येत्या ३ आणि ४ सप्टेंबरला जीएसटी

परिषदेची बैठक होणार आहे. त्यात याबाबत निर्णय होईल, आणि तो अधिकृतरित्या जाहीर केला जाईल. तोपर्यंत सर्व संबंधितांनी वाट पहावी, त्याबाबत आधीच अंदाज व्यक्त करण्यातून अफवा पसरतात, आणि परिणामी बाजारात मोठे चढउतार निर्माण होतात, असं सीबीआयसीनं म्हटलं आहे.

<><><><>

१० दिवस चालणाऱ्या गणेशोत्सवाला उद्यापासून सुरुवात होणार असून गणरायाच्या स्वागतासाठी सर्वत्र जय्यत तयारी होत आहे. महाराष्ट्रात यंदा गणेशोत्सवाला राज्य उत्सवाचा दर्जा मिळाल्यामुळे उत्साह द्विगुणित झालेला दिसत आहे आणि त्याच्या तयारीला वेग आला आहे.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी गणेश चतुर्थीच्या पूर्वसंध्येला देशवासियांना शुभेच्छा दिल्या आहेत. या सणातून नवीन ध्येयांसह सकारात्मकतेनं पुढे जाण्याची प्रेरणा मिळत असल्याचं राष्ट्रपतींनी संदेशात नमूद केलं आहे. गणेशोत्सव साजरा करताना मंडळांनी सामाजिक सौहार्द आणि एकोपा वाढवण्यासाठी प्रयत्न करावं, असं आवाहन राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी केलं आहे.

<><><><>

मुंबईहून कोकणाकडे जाण्यासाठी रो रो सेवा सुरू करण्याचा निर्णय राज्य सरकारनं घेतल्याची माहिती बंदरे आणि मत्स्यव्यवसाय मंत्री नितेश राणे यांनी आज मंत्रालयात दिली. एम टू एम ही बोट मुंबई ते रत्नागिरी आणि मुंबईत ते सिंधुदुर्ग चालवण्याची परवानगी देण्यात आली आहे. वातावरण अनुकूल झाल्यानंतर बोट सेवा सुरू होईल, असं त्यांनी सांगितलं. यामुळं जयगडपर्यंत साडेतीन तासात आणि विजयदुर्गपर्यंत साडेपाच तासात पोहोचता येईल. यासाठी अडीच ते ९ हजार रुपये तिकीट असेल.

<><><><>

जम्मू-काश्मीरमध्ये गेल्या २४ तासांपासून झालेल्या संततधार पावसामुळे जम्मू विभागात पूरस्थिती निर्माण झाली असून आतापर्यंत किमान १० जणांचा मृत्यू झाला आहे. वैष्णोदेवी यात्रा मार्गावर भूस्खलन झाल्यानं ही यात्रा तात्पुरती स्थगित केली आहे. उद्या सर्व सरकारी कार्यालये, सर्व शाळा-महाविद्यालयं बंद राहणार आहेत. राज्यातल्या प्रमुख नद्या धोक्याच्या पातळीवरून वाहत असल्यानं जम्मूमधले महत्त्वाचे महामार्ग वाहतुकीसाठी बंद

केले आहेत. जम्मू-श्रीनगर आणि जम्मू-उधमपूर महामार्ग भूस्खलन आणि पाणी साचल्यानं बंद आहेत.

पंजाबमध्येही सुरू असलेल्या संततधार पावसामुळे सात जिल्ह्यांत गंभीर पूरस्थिती निर्माण झाली आहे. भाक्रा, रणजीत सागर धरण आणि हुसैनीवाला धरणांतून पाणी सोडल्यानं पूरस्थिती अधिक गंभीर झाली आहे. पूरस्थितीमुळे २७ ऑगस्ट ते ३० ऑगस्ट या कालावधीत सर्व शाळांना सुट्टी जाहीर केली आहे.

<><><><>

अमेरिकेनं भारतातून आयात केलेल्या वस्तूंवर लादलेला अतिरिक्त २५ टक्के कर उद्यापासून लागू होणार आहे. याबाबतच्या सूचना आज जारी झाली. भारत रशियाकडून तेल आयात करत असल्यामुळे ट्रम्प यांनी काहीच दिवसांपूर्वी भारतावर हा अतिरिक्त कर लादला होता. हा कर अन्याय्य असून भारताच्या हितासाठी शक्य ते सगळं करू, असं प्रत्युत्तर भारतानं दिलं आहे.

<><><><>

अमेरिकेकडून लागू होणारं अतिरिक्त आयात शुल्काची अंमलबजावणी उद्यापासून सुरू होणार असल्यानं देशातले शेअर बाजार आज मोठ्या प्रमाणात घसरले. सकाळपासून घसरणीत सुरू झालेले शेअर बाजार अखेरच्या अर्धा तासात आणखी जास्त घसरले. व्यवहार संपले तेव्हा सेन्सेक्स ८४९ अंकांनी घसरुन ८० हजार ७८७ अंकांवर स्थिरावला. निफ्टी २५६ अंकांची घट नोंदवून २४ हजार ७१२ अंकांवर बंद झाला.

<><><><>

भारतातून आयात केलेल्या वस्तूंवर २५ टक्के अतिरिक्त आयात शुल्क लावायच्या अमेरिकेच्या निर्णयाबद्दल फिओ अर्थात फेडरेशन ऑफ इंडियन एक्सपोर्ट ऑर्गनायजेशन्स चिंता व्यक्त केली आहे. या अतिरिक्त शुल्काचा मोठा फटका भारताला बसेल. यामुळे भारताहून अमेरिकेला जाणाऱ्या ४७ ते ४८ बिलियन अमेरिकन डॉलर किंमतीच्या ५५ टक्के भारतीय मालाला ३० ते ३५ टक्के वाढीव किंमतीचा फटका बसेल आणि याचा फायदा चीन, व्हिएतनाम, कंबोडिया इत्यादी देशांना मिळेल, अशी भीती फेडरेशनचे अध्यक्ष एस. सी. राहलान यांनी व्यक्त केली. याचा मोठा परिणाम मुख्यतः कापड उद्योग, कोळंबीसह इतर समुद्री खाद्यपदार्थ, चामड्याचा उद्योग, सिरॅमिक, रसायनं, हस्तकला, गालिचे इत्यादी

क्षेत्रांना बसेल, असा अंदाज त्यांनी व्यक्त केला. या परिस्थितीत सरकारने या उद्योगांना पाठिंबा देऊन कर्ज अनुदान योजना आणि निर्यात कर्ज सहाय्य योजनांना चालना देण्याची गरज त्यांनी अधोरेखित केली.

**<><><>**

मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे यांना पूर्वपरवानगी न घेता मुंबईच्या आझाद मैदानावर आंदोलन करता येणार नाही, असा आदेश मुंबई उच्च न्यायालयानं आज दिला. मुंबईचं दैनंदिन जीवन आणि गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर राज्यातल्या कायदा-सुव्यवस्थेचा विचार करता त्यांना खारघर इथं पर्यायी जागा देण्याचा विचार सरकारनं करावा, असं मुख्य न्यायाधीश न्यायमूर्ती आलोक आराधे आणि न्यायमूर्ती संदीप मारणे यांच्या खंडपीठानं सुचवलं.

**<><><>**

श्रीलंकेचे माजी राष्ट्रपती रानिल विक्रमसिंघे यांना जामीन मंजूर झाला आहे. प्रकृती अस्वास्थाच्या कारणावरुन त्यांना हा जामीन मिळाला. लंडन दौऱ्यासाठी सरकारी संपत्तीचा गैरवापर केल्याच्या आरोपावरुन शुक्रवारी त्यांना अटक झाली होती.

**//<><><><>//**